जय महाराष्ट्र दिलखुलास, मी मुख्यमंत्री बोलतोय व अन्य प्रासंगिक कार्यक्रमांच्या चित्रिकरण व प्रसिध्दीसाठी होणाऱ्या खर्चास प्रशासकिय मान्यता मिळण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०१७/प्र.क्र.१४२/३४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: ०५ ऑक्टोंबर, २०१७

<u>वाचा</u>:- १. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांचे पत्र क्र.वृत्तचित्र-१७/मी मुख्यमंत्री बोलतोय प्र.मान्यता/का-७/६४० दि.२९ मे,२०१७
२. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.पूरक-२०१७/प्र.क्र.१२९/अर्थ-३ दि.१८/०८/२०१७

प्रस्तावना :-

जनतेशी थेट संवाद साधण्यासाठी तसेच शासन राबवित असलेल्या विविध जनकल्याणकारी योजना जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने दृकश्राव्य माध्यमांसाठी मा.मुख्यमंत्री महोदयांचा सहभाग असलेला जय महाराष्ट्र/ दिलखुलास व "मी मुख्यमंत्री बोलतोय" हा कार्यक्रम सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

२. जनतेशी थेट संवाद साधण्याचा उपक्रम, दूरचित्रवाणी वाहिनी आणि रेडिओवर शासन राबवित असलेल्या विविध जनकल्याणकारी योजना जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने दृकश्राव्य माध्यमांसाठी मा.मुख्यमंत्री महोदयांचा सहभाग असलेला "मी मुख्यमंत्री बोलतोय" हा कार्यक्रम पूर्वलक्षी प्रमाणे एप्रिल,२०१७ पासून सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

३. जय महाराष्ट्र/दिलखुलास, "मी मुख्यमंत्री बोलतोय" व अन्य प्रासंगिक कार्यक्रमाच्या चित्रीककरणासाठी महिन्यातून दोन भागाचा होणारा खर्च त्याप्रमाणे एक वर्षासाठी अंदाजे होणाऱ्या खर्चाचा तपशिल व कार्यक्रमाच्या प्रसिध्दीसाठी वर्तमानपत्रातून जाहिराती आणि दूरदर्शन केंद्रावरुन प्रसिध्दी करण्यासाठी लागणारा एकूण खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

अ. क्र.	बाब	तपशिल	१ भागा-करिता अंदाजे खर्च	महिन्यातून २ भागाचा खर्च	एक वर्षाचा एकूण खर्च
१	जय महाराष्ट्र/दिलखुलास, मी मुख्यमंत्री बोलतोय व अन्य प्रासंगिक कार्यक्रमाचे	कार्यक्रमाचे दिग्दर्शन, संहिता लेखन, सूत्रसंचालन करणे, ५ कॅमेरा सेटअपवर	१०,००,०००	२०,००,०००	२,४०,००,०००

	चित्रिकरणव निर्मितीचा खर्च	शुटिंग करणे, चित्रीकरणाचे क्रोमा, कलर करेक्शन, ग्रेडिंग करणे, मॉन्टेत शुटिंग करणे, मॉन्टेज म्युझिक, मॉन्टेज एडिटींग करणे, सुपर करणे, मेकअप मन, फ्लोअर मॅनेजर उपलब्ध करणे, लाईटमन उपलब्ध करणे			
	कार्यक्रम दूरदर्शनवरुन प्रसारणचा खर्च	दूरदर्शन वाहिनीवरुन प्रत्येक महिन्याच्या ३ रा आणि ४ था रविवार एका भागाच्या प्रसारणाचा खर्च प्रत्येकी रु.२०,०००/ याप्रमाणे रु.४०,०००/- आणि प्रत्येक महिन्याच्या ३ रा आणि ४ था सोमवार एका भागाच्या पुन:प्रसारणचा खर्च प्रत्येकी रु.२२,०००/- याप्रमाणे रु.४४,०००/- (२५% सवलत आणि १५% सेवाकरांसहित दर)	७५,०००		९,००,०००
	कार्यक्रम राज्यातील “अ” वर्ग वृत्तपत्रातून प्रसिध्दीचा खर्च	राज्यातील अ वर्ग मराठी वृत्तपत्रांची संख्या ५१ आहे. मराठी वर्तमानपत्रांचा सामाईक दर रु.२,२७०/- प्रति चौ.से.मी. याप्रमाणे २४० चौ.सें.मी. रंगीत जाहिरातीसाठी एका कार्यक्रमाची १ महिन्यात, जाहिरात ३ वेळा याप्रमाणे १२ महिन्यासाठी जाहिरातीचा अंदाजे खर्च (२,२७० X २४०X३X१२ = १,९३,१०,४००/-)	१६,३४,४००	-	१,९६,१२,८००
	एकूण		२७,०९,४००	२०,००,०००	४,४५,१२,८००/-

४. जय महाराष्ट्र / दिलखुलास,मी मुख्यमंत्री बोलतोय अन्य प्रासंगिक कार्यक्रम महिन्यात कमाल दोन वेळा, तर वर्षातून २४ वेळा प्रसारित करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमांच्या निर्मिती व प्रसारणासाठी

तंत्रज्ञांनाच्या सेवा उपलब्ध करुन घेण्याकरिता आणि त्यावरील येणाऱ्या अंदाजे **रु. ४,४५,१२,८००/- (रुपये चार कोटी पंचेचाळीस हजार आठशे फक्त)** इतक्या रकमेस प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

५. प्रस्तूत खर्च सामान्य प्रशासन विभाग, मागणी क्र. ए-६,२२२०- माहिती व प्रसिध्दी, ६० इतर, १०१ जाहिरात व दृक प्रसिध्दी (००) (०३) शासकीय योजनांची विशेष प्रसिध्दी मोहिम योजना अंतर्गत, २६ जाहिरात व प्रसिध्दी (संगणक सांकेतांक क्र. २२२०११७५) या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात येईल.

६. हा शासन निर्णय, नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ८६/१७/१४४३ दि.१३/७/२०१७ व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.४०२/२०१७/व्यय-४ दि.१६/०७/२०१७ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१००५१७५६००६९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramkisan Narayanrao Musale

Digitally signed by Ramkisan Narayanrao Musale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e28f6332f6edfebdfb055bf154f99ec0b0d9e613209e20e7a215f026da6875ae, cn=Ramkisan Narayanrao Musale
Date: 2017.10.05 17:53:47 +05'30'

(रा. ना. मुसळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
२. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य
३. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सचिव, (माहिती), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
६. सर्व संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
७. मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
८. महालेखापाल ½ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखा परीक्षा), मुंबई, नागपूर
९. अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई, नागपूर
१०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
११. नियोजन विभाग/का.१४४३ व वित्त विभाग/व्यय-४
१२. सर्व मंत्रालयीन विभाग
१३. उप संचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१४. निवड नस्ती का.३४.